


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : २९० वा | रविवार दि. १९ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# दाभाडीमध्ये झाला दरोडा अन् खून!

**जनसंचलन/मोताळा**



दाभाडीच्या बस स्टँडजवळ दाताळा रोडवर पशुवैद्यकीय डॉक्टर गजानन टेकाळे यांच्या घरी काल मध्यरात्री दरोडा पडला. त्यांच्या पत्नी माधुरी टेकाळे यांचा या दरोड्यामध्ये जीव गेला आहे. घरात पती-पत्नी दोघेच होते. दहाव्या वर्गात शिकणारी मुलगी सहली निमित्त बाहेर होती. सकाळी पाच वाजता सदर दरोडा पडल्याची घटना लक्षात आली. कारण डॉक्टर गजानन टेकाळे बेशुद्ध अवस्थेमध्ये होते. तर त्यांच्या पत्नी सौ माधुरी टेकाळे गतप्राण झालेल्या होत्या. मृतक माधुरी टेकाळे यांचा चेहरा पूर्णपणे काळा पडलेला होता. दरोडेखोरांनी बेडरूम मध्ये असलेले कपाटे तोडून दागिने आणि कॅश चोरून नेले असल्याचा अंदाज आहे. झटापटी दरम्यान दरोडेखोरांनी माधुरी टेकाळे यांचा जीव घेतला असावा, असा संशय आहे. डॉक्टर गजानन टेकाळे अत्यवस्थ असून त्यांना मलकापूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यांच्याही मेंदूवर मार बसल्याचे समजते. दरम्यान घटनेची मेंदूवर मार बसल्याचे समजते. दरम्यान घटनेची माहिती मिळताच बोराखेडी पोलिसांनी दाभाडी कडे प्रयाण केले आहे. सदर घटनेने संपूर्ण परिसरामध्ये खळबळ निर्माण झाली आहे. दरोडा टाकून दरोडेखोर पसार झाले. सकाळी ५ वाजे दरम्यान जेव्हा टेकाळे यांचे नातेवाईक घरी पोहा-चले तेव्हा सदर प्रकार समोर आला.

# समृद्धीवर पुन्हा झोपेची डूलकी! एक ठार; एक गंभीर!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

मृत्यूचा सापळा बनलेल्या समृद्धी महामार्गावर १८ जानेवारी रोजी चॅनल क्रमांक ३३६.८ मुंबई कॉरिडोरवर एक भीषण अपघात झालाय.हा अप-घात कार व ट्रकमध्ये झाला असून एक ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. कार क्रमांक -२८--९५३० चा चालक श्रव मेलानी वय २० राहणार ना-गपूर, हे आपल्या मित्रासोबत नागपूर वरून संभाजीनगर कडे जात असताना कारचालकाला झोपेची डुलकी लागल्याने कार अनियंत्रित होऊन समोर जात असलेला ट्रक क्रमांक -१२--३४३३ चे चालक वैभव रावसाहेब व्यवहारे वय २८ रा. कवडीपाट, लोणी काळभोर, ता. हवेली,जिल्हा पुणे हे इमर्जन्सी लेनवर आपले वाहन चालत असताना पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या कारच्या चालकाला झोपेमुळे समोरील ट्रकचा अंदाज न आल्याने पाठीमागून उजव्या साइडच्या टायर जवळ कार धडकली व कार पुन्हा मिडीयम मधील बॅरियरला धडकून यामध्ये ड्रायव्हर च्या बाजूला समोर बसलेले कार मधील सुजोग सोनी वय २० वर्ष रा. नागपूर यांचा जागीच मृत्यू झाला. सोबत असलेले आयुष जैन वय २० वर्ष रा. नागपूर हा गंभीर जखमी झाला. व चालक किरकोळ जखमी झाला. त्यांना तात्काळ समृद्धी महामार्ग ॲम्बुलन्सचे डॉक्टर वैभव बोराडे,डॉक्टर यासीन शहा, चालक दिगंबर शिंदे, व शैलेश दळवी यांनी जागेवर प्रथम उपचार करून पुढील उपचार कमी जालना येथे घेऊन गेले तसेच,समृद्धी महामार्ग टीमचे कैलास आघाव, श्रीकृष्ण बच्छीरे, इंगोले ,गोपाले, कराळे ,अभिषेक काणेकर व पवार या सर्वांनी अथक प्रयत्न करून मृतक व जखमी यांना वाहनाच्या बाहेर काढले.

# रस्त्यावर जनावरांचा कब्जा; कोंडवाडा कधी सुरू होणार?

## नगरपालिकेचे दुर्लक्ष, जनावरांचा त्रास दिवसेंदिवस वाढतोय!




**जनसंचलन/ चिखली**

शहरातील मुख्य रस्त्यांवर मोकाट जनावरांचा मुक्तसंचार हैदोस माजवत असून वाहनचालक आणि पादचाऱ्यांचे जीव धोक्यात आले आहेत. चिंच परिसर, संभाजी नगर, बाबुलॉज चौक, जयस्तंभ चौक, बसस्थ-ानक परिसरासह गर्दीच्या ठिकाणी कळपाने जना-वरे थाटात रस्त्यावर ठाण मांडून बसलेली दिसतात. नगर परिषदेकडून बाबुलॉज चौकात कोंडवाडा तयार करण्यात आला आहे, मात्र तो अद्याप कार्यान्वित झालेला नाही. नागरिकांसाठी ही प्रतीक्षा सहनशक्तीच्या पलीकडे गेली असून अपघातांची संख्याही वाढली आहे. जनावरांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून, तर स्थानिक प्रशासनाचा निष्क्रियपणा चांगलाच चव्हाट्यावर आला आहे. कोंडवाडा त्वरित सुरू करून मोकाट जनावरांवर उपाययोजना कराव्यात, अन्यथा संतप्त नागरिक आंदोलन छेडतील, असा इशारा देत आहेत. प्रशासना-चा हलगर्जीपणा आणि जनावरांच्या हैदोसामुळे नागरिक त्रस्त असून ठोस कृतीची मागणी केली जात आहे.

# ना.मकरंद जाधव यांच्याकडे बुलढाण्याचे पालकत्व!



**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रात महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार आणि खातेवाटप होऊन एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला. मात्र, पालकमंत्री पदासंदर्भात निर्णय झाला नव्हता. अखेर आज (१८ जानेवारी) पालकमंत्र्यांची यादी जा-हीर झाली आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री पद मकरंद जाधव पाटील यांना देण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचं पालकमंत्रिपद असणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे जिल्ह्याचं पालकमंत्रिपद असण-ार आहेत. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्हा आणि बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद देण्यात आलं आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# प्रयागराज कुंभमेळ्यासाठी सोडण्यात आलेल्या विशेष रेल्वे गाडयांना शेगाव येथे थांबा मिळावा...

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केली रेल्वेमंत्र्यांकडे मागणी...

जनसंचलन/ बुलढाणा

प्रयागराज येथील कुंभमेळाव्यासाठी सोडण्यात आलेल्या विशेष रेल्वे गाडयांना शेगाव रेल्वे स्थानकावर ही थांबा मिळावा अशी मागणी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे उत्तर प्रदेशातील प्रयाग राज येथे १३ जानेवारीपासून कुंभमेळाला सुरुवात झाली आहे बारा वर्षानंतर येणाऱ्या या कुंभमेळाव्यात देशभरातील भाविकांना सहभागी होता यावे यादृष्टीकोनातून केंद्र सरकारच्यावतीने विशेष रेल्वे गाड्या ही सोडण्यात आल्या आहे यामध्ये हुजूर साहेब नांदेड पटना कुंभमेळा एक्सप्रेस,,काचीगुडा पटना कुंभमेळा एक्सप्रेस आणि पटना सिकंदराबाद कुंभमेळा एक्सप्रेस ह्याचा समावेश आहे ह्या विशेष रेल्वे गाड्या माझ्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून जात आहे परंतु या गाड्यांना शेगाव येथे थांबा नाही . संत गजानन महाराजांचे समाधीस्थळ शेगाव येथे आहे संतनगरी शेगाव येथे देशभरातून लाखो भाविक येत असतात भक्तांची मांदियाळी या ठिकाणी दररोज दिसून येते कुंभमेळा विशेष रेल्वे गाड्यांना शेगाव येथे थांबा दिल्यास भक्तांना शेगाव येथील गजानन महाराजांच्या समाधीस्थळचे दर्शन घेण्याची संधी मिळेल आणि बुलढाणा जिल्ह्यातील भक्तांनाही प्रयागराज येथील कुंभमेळा



येथे जाण्यासाठी सुविधा उपलब्ध होईल त्या दृष्टिकोनातून शेगाव रेल्वे स्टेशनवर उपरोक्त तिन्हीही कुंभमेळा विशेष रेल्वेला थांबा द्यावा अशी मागणी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे

# पिंपरीत ४०० एकरमध्ये होणार निरंकारी संत समागम

## २४ जानेवारीपासून निरंकारी संत समागमात मानवतेचा महासंगम

जनसंचलन/मलकापुर

महाराष्ट्राचा ५८वा निरंकारी संत समागम सुरु होण्यास अवघे काही दिवस उरले असल्याने समागमाच्या पूर्वतयारीमध्ये लागलेले निरंकारी भाविक भक्तगण समागम स्थळ समतल व सुंदर बनविण्यासाठी त्यामधील प्रत्येक व्यवस्थेला अंतिम रुप देत आहेत. समागमाच्या पूर्वतयारीमध्ये मलकापुर बुलढाणा जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो सेवादल स्वयंसेवक आणि भाविक भक्तगण सातत्याने आपल्या निष्काम सेवा अर्पण करत आहेत. पिंपरीतील मिलिटरी डेअरी फार्मच्या सुमारे ४०० एकरच्या विस्तीर्ण मैदानात शुक्रवार, दि.२४ जानेवारी २०२५ पासून हा तीन दिवसीय संत समागम सुरू होत असून, त्याची सांगता २६ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. मुख्य सत्संग कार्यक्रम दररोज दुपारी २ वाजता सुरू होईल ज्यामध्ये अनेक वक्ते, गीतकार, कवी सद्गुरु आणि ईश्वराप्रती आपल्या मनातील भावना व्यक्त करतील. शेवटी रात्री ८ वाजल्यापासून सर्वांना सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांचा पवित्र आशीर्वाद लाभणार आहे. मागील एक महिन्यांपासून महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्यांतून निरंकारी भक्तगणांनी समागम स्थळांवर येऊन आपल्या निष्काम सेवांच्या माध्यमातून समागम स्थळाला एका सुंदर नगरीच्या रुपात परिवर्तित केले आहे. सर्व श्रद्धाळू ज्या उत्साहाने, आवडीने, भक्तिभावाने, मर्यादा व अनुशासनाचे पालन करत आपल्या सेवा निभावत आहेत ते पाहून जनसामान्य अत्यंत प्रभावित आहेत. समागम स्थळाचे हे अनुपम दृश्य आजूबाजूने जाणाऱ्या वाटसरूंना आणि स्थानिक नागरिकांना आकर्षण व उत्सुकतेचे केंद्र बनून राहिले आहे. मानवतेच्या कल्याणासाठी आयोजित केलेल्या या संत समागमाचे साक्षी बनण्यासाठी समस्त भाविकांना व निरंकारी भक्तगणांना नुक्कड नाटक, बॅनर तसेच पुण्याच्या कानाकोपऱ्यात खुल्या प्रांगणांमध्ये सत्संगच्या माध्यमातून सादर आमंत्रित केले जात आहे ज्यायोगे त्यांनी या संत समागमामध्ये सहभागी होऊन आपले जीवन सार्थक करावे. समागमात सहभागी होणाऱ्या सर्व भक्तगणांसाठी व्यापक स्तरावर निवासी तंबू, लंगर, कॅन्टीन, दवाखाने, सुरक्षा व्यवस्था, पार्किंग आणि रेल्वे




स्थानक आणि बसस्थानकातून येजा करण्यासाठी वाहतूक व्यवस्था इत्यादींची यथोचित व्यवस्था करण्यात आली आहे. समागम स्थळावर स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जात आहे. प्रकाशन विभागाकडून समागम स्थळावर वेगवेगळ्या ठिकाणी स्टॉल लावले जात आहेत. संत निरंकारी मिशनचे सचित्र दर्शन घडविण्यासाठी आकर्षक निरंकारी प्रदर्शनीचेही आयोजन केले जात आहे यासह एकूण आठ कार्यशाळा असलेली भव्य बाल प्रदर्शनी देखील असेल, प्रत्येक कार्यशाळा मुलांना आकर्षक आणि शैक्षणिक अनुभव प्रदान करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. हे सर्व सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनानेच शक्य झाले आहे.

# समाजरत्न दयाभाई खराटे यांच्या १६ व्या स्मृतिदिनी अभिवादन सभा संपन्न

## साहित्यिक,पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते,कलावंताचा करण्यात आला सन्मान

जनसंचलन/मलकापूर

आजीवन समाजकार्याला वाहून घेणारे बुद्ध,फुले,शाहू,डॉ.आंबेडकर यांची विचारधारा जनमाणसात रुजवणारे भारतीय बौद्ध महासभा माजी अध्यक्ष,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाड़ा विद्यापीठ नामांतर चळवळीचे अग्रणी शिलेदार समाजरत्न दयाभाई खराटे यांच्या १६ व्या स्मृतिदिनानिमित्त जनता महाविद्यालय मलकापुर येथे अभिवादन सभा संपन्न झाली या सभेला प्रमुख वक्ते म्हणून दादाभाऊ अभंग भीमा कोरेगाव विजयस्तंभ संवर्धन व संरक्षण समिती यांची उपस्थिती होती, अध्यक्षस्थानी भा.बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एस. एस.वले सर होते तर प्रमुख अतिथी म्हणून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा नेते प्रशांतभाऊ वाघोदे, मलकापूर ग्रा.पो.स्टे.ठाणेदार संदीप काळे, एमआयडीसी पो. स्टे.ठाणेदार हेमराज कोळी ,शाहीर डी.आर.इंगळे, अजय सावळे, सुशील मोरे उपस्थित होते सर्वप्रथम भंते महाणाम,भंते संघपालबोधी,भंते काश्यप व उपस्थित मान्यवरांचा हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला व दयाभाई खराटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार व दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले तसेच मान्यवरांनी त्यांच्या जीवन कार्यावर आपले विचार व्यक्त केले दरवर्षीप्रमाणे सभेचे निमंत्रक तथा वंचित बहुजन आघाडीचे बुलढाणा जिल्हा महासचिव आतिशभाई खराटे यांच्या द्वारा समाजरत्न दयाभाई खराटे फाउंडेशन वतीने विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला यामध्ये प्रामुख्याने राज्यस्तरीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य जीवन गौरव पुरस्कार दादाभाऊ अभंग, महात्मा ज्योतिबा फुले साहित्यिक जीवन गौरव पुरस्कार डॉ.आर.डी.इंगोले सर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव वानखेडे, महाकवी वामनदादा कर्डक प्रबोधन जीवन गौरव पुरस्कार मीनाताई खरे,यांना, साहित्य गौरव पुरस्कार प्रा.एस.डी.झनके, प्रा.रमेश डोंगरे, प्रा.अरुण सावंग यांना, समाज गौरव पुरस्कार वंचितचे युवा जिल्हाध्यक्ष अनिल वाकोडे, खामगाव कृ ऊ.बा.स.उपसभापती संघपाल जाधव, री.सा.सं अध्यक्ष प्रकाश दांडगे, दादारावजी हेलोडे, जी.एन.अहिरे, डब्ल्यू.डी.वानखेडे, निवृत्ती वानखेडे, सुनील बोदडे, राजेश वानखेडे, अशोक इंगळे, समाधान डोंगरे, शरदराव तेलंग, समाजभूषण पुरस्कार अमोल मेढे, गौतम इंगळे, उमेश वानखेडे, गिरीश उमाळे, शुभम सावळे यांना, पत्रकारिता सन्मान पुरस्कार सागरकुमार झनके, मनोज बागडे, करण झनके तर कलावंत सन्मान पुरस्कार बंधू विजय वानखेडे यांना यांना प्रदान करण्यात आला सभेचे सूत्रसंचालन भाऊराव उमाळे यांनी केले तर आभार अतिशभाई खराटे यांनी मानले



दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विश्वशांती दिवस म्हणून प्रजापिता ब्रह्मा बाबा यांची ५६ वी पुण्यतिथी साजरी केली



**जनसंचलन/बुलढाणा**

आज प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय ,एकता नगर ,बुलढाणा, येथे नारीशक्ती हे विश्वातील सर्वात श्रेष्ठ आणि विशाल संघटन चा पाया ठेवणारी ब्रह्माकुमारी संस्थां चे संस्थापक प्रजापिता ब्रह्मा बाबा यांची आज ५६ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये सेवाकेंद्र संचालिका ब्रह्माकुमारी उर्मिलादीदी , ब्रह्माकुमारी पूनम दीदी तसेच दैनिक भास्कर चे जिल्हा संवाद दाता श्री सुनील जी तिजारे सर ,एडवोकेट किरण राठोड मॅडम यांना प्रमुख अतिथी म्हणून बोलावण्यात आले होते. तसेच प्रजापिता ब्रह्मा बाबा यांना श्रद्धांजली देण्यासाठी प्राध्यापक ज्योती पाटील,सावळे मॅडम मीनल ताई आंबेकर , नवनिता ताई चव्हाण ,वैशाली राजपूत ,शैलेश खेडकर (एन. एस. यु. आय. जिल्हा अध्यक्ष) यांची उपस्थिती होती. ब्रह्माकुमारी उर्मिला दिदी यांनी सांगितले की ब्रह्मा बाबा ने नारीला शक्ती बनवण्याचा असा संकल्प घेतला की आपली सर्व धनदौलत ईश्वराला समर्पित करून अशी ट्रस्ट स्थापन केली आणि त्या ट्रस्टच्या संचालनाची जिम्मेवारी नारी शक्ती यांच्यावर सोपवली आणि स्वतः मागे झाले. या कार्यक्रमात सुनीलजी तिजारे सर यांनी ब्रह्मा बाबा प्रती शब्द सुमन अर्पित केले सोबतच एडवोकेट किरण राठोड मॅडम यांनी पण ब्रह्मा बाबा प्रती आपल्या मनातले भाव सर्वांच्या समोर शब्दांद्वारे ठेवले. कार्यक्रमाच्या शेवटी सेवा केंद्रावर आलेले सर्व ब्रह्मावत्स यांनी ब्रह्मा बाबा यांच्या शांतीस्तंभ च्या समोर ब्रह्मा बाबा यांना आठवण करत पुष्प-फुलां द्वारे ब्रह्मा बाबांना श्रद्धांजली अर्पण केली.

# मलकापूर मध्ये भव्य टेनिस बॉल तसेच आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचा आयोजन



**जनसंचलन/मलकापूर**

मलकापुर येथे छत्रपती शिवाजी क्रिकेट क्लब, संग्राम क्रिकेट क्लब, आणि पोलीस मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य टेनिस बॉल तसेच आमदार चषक क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष यश भैय्या संचेती यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी उपस्थित खेळाडूंशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवले. यावेळी उपस्थित प्रमुख मान्यवर श्री.शिवराजजी जाधव, श्री.दुर्गेशजी प्रसाद, जाधव राजपुरे, श्री.अतुलसिंगजी राजपूत, श्री.ईश्वरभाऊ बोबडे, श्री.नितीनजी भुजबळ, श्री. अतुलजी जाधव, श्री.शुभमजी बोबडे, श्री.नानाभाऊ येशी, श्री.रविंद्रजी वानखेडे, श्री.विकीजी जाधव उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या मंडळाचे कौतुक केले व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# उपक्रमशील शिक्षकांचा विनोबा ॲप मधील उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान

**जनसंचलन/मलकापुर**

जिल्हा परिषद बुलढाणा व ओपन लिंक फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार अंतर्गत राबविण्यात येणारा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा(बा) ॲप च्या माध्यमातून जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांना प्रत्येक महिन्यात प्रोत्साहन पर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. डिसेंबर महिन्यातील जिल्हा स्तरावरील पोस्ट ऑफ द मंथ सुनिता सैंदाणे, सुरेश सैंदाणे, मंजुषा कुलकर्णी, संगीता सनप आणि गणेश राऊत सर तसेच महावाचन विजेते रंजना सोनवणे आणि सुरेश उतपुरे सर घिर्णी तसेच उपक्रमशील कार्य करत असलेले केंद्र हिवरखेड, जनुना, किनोळा, खेरडा, सोनाळा आणि शेंबा बुद्रुक सोबतच जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धा डायट व शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ज्या शाळेच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक आलेला आहे अशा शाळा यांना मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात सर , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी एम मोहन सर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड सर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार सर, शिक्षणाधिकारी खरात सर , शिक्षणाधिकारी माध्यमिक अनिल आकाळ सर, योजना शिक्षणाधिकारी वैशाली ठग, उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर सर, उपशिक्षणाधिकारी उमेश जैन सर , डायट प्रिन्सिपल भटकर सर तसेच इतर डायट अधिकारी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे शिक्षकांना आवाहन केले. यावेळी कार्यक्रमाला सदरील पुरस्कार देताना जिल्ह्यातील शिक्षक, मुख्याध्यापक, सर्व केंद्रप्रमुख सर सोबतच विस्तार अधिकारी तथा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमाचे कार्यक्रम समन्वयक वानखेडे सर , जिल्हा समन्वयक नजीर शेख ,अजय राठोड उपस्थित होते.

# बुध्द चरित्रांमृत कथा हृदय परिवर्तन करण्यास सक्षम - राधेश्याम चांडक

**जनसंचलन/बुलढाणा**

सद्भावना सेवा समिती आणि सिंहनाद सेवा संघ द्वारा आयोजित संगीतमय बुध्द चरित्र कथेचे दि.३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत सहकार विद्या मंदिर मध्ये आयोजन केले आहे. महापंडीत सध्दर्याचार्य भिक्षु प्रियदर्शी थेरोजी पाली बौध्द साहित्याचे प्राध्यापक, केलानिया युनिव्हसिटी श्रीलंका तिन दिवस बुध्द चरित्र कथा प्रवक्ता आहेत. प्रथम दिवशी बोधीसत्वच्या जन्मापासून महाभिनिष्क्रमण द्वितीय दिवशी कठोर तप आणि बोधिकथा तृतीय दिवशी प्रथम उपदेश आणि भगवंताची महिमा या विषयावर प्रियदर्शी थेरोजी बुध्द कथेचे अमृतवर्षा करणार आहे. थेरोजी यांचा गाढा अभ्यास, विद्वता व साधना एवढी प्रचंड आहे की, ही बुध्द चरित्रांमृत कथा हृदय परिवर्तन करण्यास सक्षम आहे, असे भावोद्गार सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले.सिंहनाद सेवा संघ आणि सदभावना सेवा समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत भाईजी यांनी आपले विचार मांडले व जनतेला कथा श्रवण करण्याचे आवाहन केले. कथेची वेळ सकाळी ११ ते १ राहणार असून वयोवृध्द नागरिकांसाठी शहराच्या मुख्य चौकातून सहकार विद्यामंदिर पर्यंत बसेसची व्यवस्था करण्यात येईल, अशा प्रकारची संगीतमय बुध्द चरित्र कथा प्रथमच बुलडाणा शहरात होत आहे, अशी माहिती राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांनी दिली. सर्व श्रोत्यांनी कथला पांढरीशुभ्र वस्त्र परिधान करुन यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले. सिंहनाद सेवा संघ व सदभावना सेवा समितीचे पदाधिकारी विजय वाकोडे, गजानन जाधव, सुहास गवई, शिवाजीराव गवई, दादाराव पगारे, प्रशांत इंगळे, सुनील जाधव, सिध्दार्थ शर्मा, सुरेशचंद्र गट्टाणी, श्री. घीरके,दिलीप जाधव, सुमीत सरदार, शैलेश भंडारे, निवृत्ती सरकटे, सोनाजी दाभाडे यांनी भाईजीसोबत चर्चा करुन कार्यक्रमा विषयीच्या तयारीचा आढावा घेतला. वरील सर्व कार्यकर्त्यासोबत चंपालाल शर्मा, विजय सावजी, राजेश देशलहरा, उमेश मुंदडा, तिलोकचंद चांडक, प्रा. प्रकाशचंद्र पाठक, सुभाष दर्डा, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.





पाली बौध्द साहित्य, संस्कृत बौध्द साहित्याचे प्रकांड पंडीत केलानिया विद्यापिठात प्राध्यापक, नागपूर विद्यापीठातून बी.ए. बनारस हिन्दू विश्व विद्यालयातून पाली साहित्यात एम.ए. संम्पूर्णानंद विद्यापीठ मधून बौध्द दर्शनात आचार्य पदवी, हाँगकाँग विद्यापीठ मधून एमबीएस. सध्दर्माचार्य (सूत्र पिटक) विद्योद्य महापरिवन श्रीलंका, विपश्यना व योगमध्ये कोलंम्बो विश्वविद्यालय पी.एच.डी. अनेक पदव्यामध्ये सुवर्ण पदके, हाँगकाँग विद्यापीठाचे जी.एस.जी. अवार्ड, डॉ. आंम्बेडकर डेव्हलपमेंट सोसायटीचे धम्म प्रवचक अवार्ड, द बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडीयाचे धर्म भूषण अवार्ड, श्रीलंका मलेशिया, हाँगकाँग, चीन, म्यानमार, पाकीस्तान, थायलंड इ. विदेश भ्रमण करुन प्रवचने.

# बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाची सर्वसमावेशक कार्यकारिणी घोषीत...

## उपाध्यक्ष, सहसचिव, संघटकसह इतर पदे बहाल मोताळा ते मेहकर, संग्रामपूरपासून ते सिंदखेडराजापर्यंत सर्वांचा सहभाग

**जनसंचलन/बुलढाणा**

सर्वात जुनी, ८३ वर्षांचा इतिहास तसेच पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नीत बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाची सर्व समावेशक विस्तारित जिल्हा कार्यकारिणी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या आदेशाने तसेच विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलींद आष्टीवकर, सरचिटणिस सुरेश नाईकवाडे, डिजिटल मिडीया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनात अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी इतर पदाधिकार्यांच्या सर्वसंमतीने घोषीत केली असून यात संग्रामपूर ते सिंदखेड राजा तसेच मेहकर ते मोताळा अशा सर्व ठिकाणच्या जेष्ठ-श्रेष्ठ तथा कार्यशिल पत्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. सदर कार्यकारिणी मध्ये आणखी काही इच्छुकांचा समावेश करून अंतिम विस्तारित कार्यकारिणी लवकरच घोषीत केली जाईल, असे जिल्हा सरचिटणिस कासिम शेख यांनी कळविले आहे. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या जिल्हा कार्यकारिणीचे मार्गदर्शक म्हणून विश्वंभर वाघमारे, बापूसाहेब मोरे (बुलढाणा), राजेश राजोरे (खामगाव), अभिमन्यु भगत (जळगाव जामोद), सुभाष लहाने (बुलढाणा), रमेश उमाळकर (मलकापूर), राजेश देशमाने, सुरेश देवकर(बुलढाणा), सतीषअप्पा दुडे (खामगाव), राजेंद्र टिकार, एस.पी.हिवाळे आदी मान्यवर राहतील. तर बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे *सन्माननिय निमंत्रक* म्हणून मुकुंद जोशी, नितिन शिरसाट, पृथ्वीराज चव्हाण (बुलढाणा), केशव घाटे (संग्रामपूर), अशरफ पटेल (देऊळगाव राजा), अनिल पाटील (जळगाव जामोद), शाम तायडे (जळगाव जामोद), हरी गोसावी (मलकापूर), फिरोज शाह (मेहकर), रामदास कहाळे (सिंदखेडराजा )आदींची नावे निश्चित करण्यात आली आहे. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने मराठी पत्रकार परिषदेच्या प्रदेश प्रतिनिधी पदी युवराज वाघ आणि गणेश निकम या दोन जणांची निवड करण्यात आली असून पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या समन्वयक पदी राजेश डिडोळकर (बुलढाणा) तर सहसमन्वयक पदी सुरेश पेठकर (नांदुरा) कार्यरत राहतील. तर पत्रकार हल्ला विरोधीकृती समितीच्या निमंत्रक पदाची जबाबदारी जेष्ठ पत्रकार विश्वास पाटील (मोताळा) यांच्याकडे देण्यात आली आहे. याच श्रृंखलेत पत्रकार हल्ला विरोधी सत्यशोधन समिती जेष्ठ पत्रकार विजय देशमुख (बुलढाणा) यांच्या नेतृत्वात काम करेल. बुलढाणा जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार पाहता बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाने कामात सुसूत्रता यावी म्हणून सर्वच तालुक्यांना कार्यकारिणी मध्ये समाविष्ट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. महिला सेल अध्यक्षपदाची सुत्रे कु. मृणाल सोमनाथ सावळे यांच्याकडे असून बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या घाटावरच्या कार्याध्यक्षपदी वसिम शेख अन्वर तर घाटाखालच्या कार्याध्यक्षपदी प्रशांत देशमुख (खामगांव) यांची निवड झालेली आहे. जिल्हा उपाध्यक्ष म्हणून रविंद्र गणेशे (बुलढाणा), संतोष लोखंडे (चिखली), डॉ.अनिल मापारी (लोणार), गजानन राऊत (खामगाव) काम पाहत आहेत. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघामध्ये कोषाध्यक्ष पदाची मोठी जबाबदारी ब्रम्हानंद जाधव यांच्याकडे आहे. जिल्हा सचिवपदी शिवाजी मामनकर (मोताळा) यांची वर्णी लागली आहे तर जिल्हा सहसचिव म्हणून गजानन तिडके (देऊळगाव राजा), महेंद्र बोर्डे (धाड) आणि यशवंत पिंगळे (नांदुरा) यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा मुख्यसंघटक पदी बाबासाहेब जाधव कार्यरत असतील. तसेच जिल्हा संघटक म्हणून प्रेमकुमार राठोड, कैलास राऊत (देऊळगाव माळी), विरेंद्रसिंग राजपूत (टाकरखेड), नागेश मोहिते (धाड) आणि निसार अन्सारी (मेहकर) आदि जेष्ठ पत्रकार जबाबदारी सांभाळतील. सुषमाताई राऊत (देऊळगाव राजा), श्रीमती सुरेखाताई सावळे, परविन बी सय्यद (चिखली), वैशालीताई तायडे, मोनीकाताई वानखेडे (खामगाव) या जिल्हा महिला प्रतिनिधी म्हणून कार्यरत असणार आहेत. जिल्हा पत्रकार संघाचे उपक्रम, कार्यक्रम तसेच महत्वाच्या घडामोडींची प्रसिध्दी करण्याची महत्वाची धुरा जिल्हा प्रसिध्दी प्रमु म्हणून अभिषेक वरपे यांच्याकडे देण्यात आली आहे, तर प्रसिध्द प्रेस फोटोग्राफर निनाजी भगत जिल्हा सहप्रसिध्दी प्रमुखपद नियुक्त करण्यात आले आहे. विभागीय पातळीवर संघटनात्मक निर्णय प्रक्रियेचे योगदान महत्वाचे ठरते यासाठी १३ तालुक्यांच्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये २ तालुके व १ विभाग आणि प्रत्येक विभाग निहाय दोन विभागीय संघटकांची नेमणूक करण्याचे बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाने निश्चित केले आहे. त्यानुसार मेहकर-लोणार साठी शेख समद (लोणार), मलकापूर-नांदुरा साठी पुरुषोत्तम भातूरकर (नांदुरा), शेगाव-खामगाव करीता धनराज ससाणे (शेगाव) आणि ईश्वर ठाकूर (खामगाव) यांची विभागीय संघटक म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. मोताळा-बुलढाणा-चिखली या तिन तालुक्यांच्या विभागीय संघटक पदी रहेमत अली, रेणुकादास मुळे (चिखली) आणि संजय शिराळ (मोताळा) यांच्यावर जबाबदारी असणार आहे. बुलढाणा जिल्हा कार्यकारिणीमध्ये केंद्रीय सदस्य म्हणून विजय चोपडे, तुकाराम रोकडे (नांदुरा), रविंद्र फोलाने (चिखली) शिवराजी वाघ, मोहम्मद इद्रिस, विलास खंडेराव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

मराठी पत्रकार परिषद
बुलढाणा
जिल्हा पत्रकार संघ

पत्रकारांच्या आरोग्य संबंधी समस्यांचे निराकरण दृत गतिने व्हावे तसेच शासनाच्या आरोग्यदायी योजनांचा लाभ पत्रकारांना मिळावा यासाठी बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाने ङ्ग *बुलढाणा जिल्हा पत्रकार आरोग्य सेल*फ ची स्थापना केली असून या सेलच्या अध्यक्षपदाचे नेतृत्व एबीपी माझाचे जिल्हाप्रतिनिधी संजय महाजन यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. तर जिल्हा सचिव म्हणून शाकीर हुसैन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डिजिटल मिडीया परिषदेची जिल्हा कार्यकारिणीही गठीत झाली आहे. सदर कार्यकारिणीच्या विभागीय सचिवपदी जितेंद्र कायस्थ यांची निवड झाली आहे तर जिल्हाध्यक्षपदी मयुर निकम आणि सरचिटणिसपदी दिपक मोरे डिजिटल मिडीया परिषदेमध्ये जबाबदारी सांभाळत आहे उपाध्यक्षपदी किशोर खंडारे यांची निवड झाली आहे. श्रीधर ढगे डिजिटल मिडीया परिषदेचे घाटाखालील अध्यक्ष म्हणून काम पाहतील. मराठी परिषदेशी संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तालुका पत्रकार संघ गठीत करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. संबंधित तालुका पत्रकार संघांचे अध्यक्ष बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीचे पदसिध्द सदस्य असतील. अजुनही अनेक पत्रकार बुलढाणा जिल्हा कार्यकारिणीत सहभागी होण्यासाठी इच्छुक असून पुढील काही दिवसात अंतिम विस्तारित महाकार्यकारिणी घोषीत केली जाणार असल्याची माहिती बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाने एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविली आहे.







दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958